स्थापना ] [ १-७-१९९१

# शिवसह्याद्री सहकारी पतपेढी मर्यादित

खेतवाडी, मुंबई-४०० ००४.

रजिस्टर नं. बी. ओ. एम./डब्लु. डी./आर. एस. आर./सी. आर./४१५/९१-९२

## २ रा
## वार्षिक
## अहवाल

## १९९२ - ९३

* कार्यालय *

१०, अतुल निवास खेतवाडी, ७ वी गल्ली,
मुंबई-४०० ००४.

## उद्घाटण समारंभ क्षणाचित्रे




**उद्घाटण सोहळा समारंभ :** व्यासपीठावरील मान्यवर श्री. वसंतराव ननावरे, कै. बाबुरावजी शेटे, श्री. शिवाजीराव देशमुख सहकारमंत्री, श्री. जर्नादन निकम, श्री. वसंतराव शिंदे, श्री. श्रीरंग पिंपळे व इतर मान्यवर



**महाराष्ट्राचे सहकार मंत्री :** मा.ना.श्री. शिवाजीराव देशमुख यांच्या हस्ते संस्था नोंदणी प्रमाणपत्र स्विकारताना संस्थेचे अध्यक्ष श्री. ज्ञानेश्वर वांगडे कै. बाबुराव शेटे. श्री. वसंतराव ननावरे, श्री. महादेव शेलार, श्री. श्रीरंग आरगडे व इतर मान्यवर

# शिवसह्याद्री सहकारी पतपेढी मर्यादित

खेतवाडी मुंबई–४००००४.

## —: सभा सुचना :—

पतपेढीच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की पतपेढीची वार्षीक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक ८–८–१९९३ रोजी दुपारी ठिक ४ वाजता **"आश्रय" अभ्यासिका** खेतवाडी बॅक रोड मुंबई–४००००४. या ठिकाणी आयोजित केलेली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे ही नम्र विनंती.

## —: सभेपुढील विषय :—

(१) मागील सर्वसाधारण सभेचा वृतांत वाचुन कायम करणे.
(२) ३१ मार्च १९९३ अखेर संपणाऱ्या वर्षाचा वार्षीक अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक स्विकारणे.
(३) सन १९९३–९४ करीता अंतर्गत हिशेब तपासनिसांची नेमणुक करणे व त्यांचा मेहनताना ठरवणे.
(४) कायदेविषयक सल्लागाराची नेमणूक करणे.
(५) अध्यक्षांच्या परवानगीने येणारे अन्य विषय.
(६) संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा विभागणीस मान्यता देणे.

संचालक मंडळाच्या आदेशावरुन

मुंबई दिनांक १२–७–१९९३.

**श्री. भरत शिवराम पिंपळे**
चिटणीस

---

## —: विशेष सूचना :—

(१) कोणत्याही सभासदास सुचना मांडावयाच्या असल्यास अशा लेखी सुचना दिनांक २७–७–९३ पर्यंत पतपेढीच्या कार्यालयात आणून द्याव्यात.
(२) गणसंख्ये अभावी सभा तहकुब झाल्यास ही सभा त्याच ठिकाणी वरील विषयावर विचार करण्यासाठी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल. या सभेला गणसंख्येची आवश्यकता भासणार नाही.
(३) भाग दाखले पतपेढीच्या कार्यालयात तयार आहेत. कृपया भाग खरेदीची पावती दाखवून घेऊन जावे.
(४) सभासदांनी आपले कर्जाचे हप्ते प्रत्येक महिण्याच्या १५ तारखेपुर्वी भरावेत.
(५) सभेस येताना सभासदांनी कृपया आपली वार्षिक अहवालाची प्रत सोबत घेऊन यावे.

# शिवसह्याद्री सहकारी पतपेढी मर्यादित

खेतवाडी मुंबई-४०००० ४.

## -: कार्यकारी मंडळ :-

(१९९१-९२ ते १९९३-९४)

संस्थापक अध्यक्ष : **श्री. ज्ञानेश्वर बापूसाहेब वांगडे** (वि. का. दं)
उपाध्यक्ष : **श्री. रामचंद्र बळीराम बाईकर**
चिटणीस : श्री. भरत शिवराम पिंपळे
खजिनदार : श्री. रामचंद्र धोंडीबा वांगडे

## ❀ संचालक ❀

श्री. शंकर विश्राम आरगडे
श्री. बबन ज्ञानू पाटील
श्री. प्रकाश तुकाराम निकम
श्री. विनोद केशव पितळे
श्री. विजय रामचंद्र शेलार
श्री. सुरेश भाऊसो पवार
श्री. नारायण रामचंद्र सोनावणे

## ❀ अंतर्गत हिशेब तपासणीस ❀

श्री. प्रकाश पुरुषोत्तम वांबर्डेकर (लेखापरिक्षक)

## -: दैनंदिन बचत एजंट :-

श्री दशरथ रामचंद्र वांगडे
श्री. सुभाष तुकाराम माने
श्री. संजय दादा शेडगे
श्री. रमेश शामराव निकम
सौ. नंदा वसंत निकम

## ❀ कर्मचारी ❀

श्री. दशरथ रामचंद्र वांगडे
श्री. अशोक कृष्णा माने
कुमारी छाया शंकर जाधव

## -: बँकर्स :-

मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमीटेड पलटन रोड शाखा मुंबई.

# शिवसह्याद्री सहकारी पतपेढी मर्यादित

खेतवाडी, मुंबई-४०० ००४.

## —: मनोगत :—

**सन्माननीय सभासद बंधू भगिनींनो :—**

**शिवसह्याद्री सहकारी पतपेढीचा** द्वितीय वार्षिक अहवाल पतपेढीच्या सर्व माननिय सभासदांना सादर करताना कार्यकारी मंडळास अत्यंत आनंद होत आहे.

मुंबईत झालेल्या दंगलीमुळे व्यापार उदीमावर विपरीत परिणाम झाला, त्याची आर्थिक झळ सर्व बँकिंग तसेच नागरी पतसंस्था व इतर सर्व उद्योगांना पोहचली. परंतु अशी प्रतिकुल परिस्थिती निर्माण झालेली असतानांही आपल्या पतसंस्थेवर याचा यत्कींचितही परिणाम न होता आपण नेहमीचा ठेवी वाढीचा वेग कायम ठेवला व नेत्रदिपक प्रगती साधली. ही आपल्या सर्वांच्या दृष्टीने भूषणावह बाब आहे. मी यावद्दल सर्व ठेवीदार, अन्यग्राहक, हितचिंतक व कर्मचारी यांचे अभिनंदन करतो.

आजच्या स्थितीला सर्वत्र चर्चिला जाणारा विषय बँका आणि पतसंस्था यामधील अफरातफर व यामुळे सर्वसामान्य लोकांचा आर्थिक संस्थावरील कमी होत चाललेला विश्वास, परंतु आपल्या पतपेढीच्या कार्यकारी मंडळाने पतपेढीच्या सभासदांशी जिव्हाळा निर्मान करुन त्यांचेकडून ठेवी मिळविण्यांत व सतत संपर्क ठेवून कर्जदारांना कर्जाचे हप्ते वेळेवर भरण्यास प्रवृत्त करण्यामध्ये यश मिळविले आहे.

आपल्या पतसंस्थेची झपाट्याने होत असलेली वाढ ही आपल्या सर्वांच्या सहकार्याचे प्रतिक आहे. पतसंस्थेच्या वतीने सभासदांना विविध प्रकारच्या कर्ज सेवा उपलब्द करुन देणे व त्यातून तळागाळातील लोकांच्या गरजा भागवून त्यांचा विकास करणे, जीवनमान उचावणे हे संस्थेचे उद्दीष्ट पूर्ण करण्याचा प्रयत्न चालू आहे. त्याकरिता सर्व सभासदांनी संस्थेच्या विविध प्रकारच्या ठेव योजनामध्ये सहभागी होऊन गुंतवणूक करणे अत्यंत गरजेचे आहे. अनेक कार्यकर्त्यांच्या तळमळीतून उभारलेल्या आपल्या पतपेढीची उन्नत्ती आपल्या सहकार्यावरच अवलंबून आहे.

आ. नम्र

दिनांक

मुंबई-४०० ००४.

श्री. ज्ञानेश्वर बापूसो बांगडे (वि.का.द.)

संस्थापक-अध्यक्ष

# शिवसह्याद्री सहकारी पतपेढी मर्यादित

खेतवाडी मुंबई–४०००० ४.

**: सन्माननिय सभासद बंधु–भगिनिंनो :**

आपल्या पतपेढीचा सन १९९२–९३ सालचा दुसरा (२ रा) वार्षीक अहवाल दिनांक ३१–३–१९९३ अखेर संपणाऱ्या वर्षाचा ताळेबंद व नफा-तोटा पत्रक संचालक मंडळाच्या वतीने आपणासमोर सादर करताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे.

**संचालक मंडळ :–**

आपल्या संस्थेचे संचालक मंडळ ११ सदस्यांचे आहे. दुसऱ्या वर्षात संचालक मंडळाच्या १२ सभा झाल्या प्रत्येक सभेस हजर राहीलेल्या सदस्यांची सरासरी ९०% पर्यंत आहे.

**भागधारक :–**

३१ मार्च १९९३ रोजी पतपेढीचे एकूण भाग धारक ९४७ झाले आहेत.

**भाग भांडवल :–**

संस्थेचे अधिकृत भाग भांडवल ५ लाख रुपये आहे. ३१ मार्च १९९३ अखेर पतपेढीचे वसुल भाग भांडवल १,७०,२००/– इतके झाले.

**सभासद कर्ज व्यवहार :–**

आज मिती पर्यंत संस्थेने गरजु सभासदांना वैयक्तीक जामीनावर मध्यम मुदतीची कर्जे दिली आहेत.

| | | |
|---|---|---|
| रुपये | ५,०४,१७५/– | इतके वर्षारंभी कर्ज सभासदाकडून येणे बाकी होते. |
| ,, | ७,७८,८००/– | इतके अहवाल सालात सभासदांना कर्ज देण्यात आले. |
| ,, | ४,३८,०४५/– | इतके अहवाल सालात सभासदांकडुन कर्ज वसुल केले. |
| ,, | ८,४४,९३०/– | वर्ष अखेरीस सभासदांकडुन कर्ज येणे बाकी आहे. |

**ठेवी :–**

संस्थेने विविध प्रकारच्या ठेवी स्विकारल्या असुन ३१ मार्च १९९३ अखेर शिल्लक ठेवी पुढील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| (१) | बचत ठेव | रु. ६५,९३९–०१ |
| (२) | मुदत व दामदुप्पट ठेव | रु. ३,९६,४५०-०० |
| (३) | आवर्त ठेव | रु. ३६,७३०–०० |
| (४) | दैनंदिन ठेव | रु. १,४६,३००–०० |
| (५) | सक्तीची बचत ठेव | रु. ७०,६९०-०८ |

## नफा विनियोग :-

संस्थेची वसुली चांगली असून संस्थेस अहवाल सालात एकुण रुपये ७४९५३-२० इतका नफा झाला आहे. त्यातून गतवर्षीचा तोटा रुपये १०९४७-५६ वजा करता एकुण रुपये ६४००५-६४ इतका नफा विनियोगासाठी उपलब्ध राहतो संचालक मंडळाने सदरहू नफ्याचा विनियोग पुढीलप्रमाणे सुचविला आहे.

| | | |
|---|---|---|
| राखीव निधी | २५% | १६,०००-०० |
| इमारत निधी | २५% | १६,०००-०० |
| बुडीत कर्जनिधी | २५% | १६,०००-०० |
| पुढील वर्षासाठी शिल्लक | | १६,००५-६४ |
| | | ६४,००५-६४ |

## आभार व ऋण निर्देश :-

आपली पतसंस्था प्रगती पथावर नेण्यासाठी ज्या **सभासद, ठेवीदार, खातेदार व हितचिंतक** यांनी प्रयत्न केले त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार परंतु प्रामुख्याने ज्यांनी **वेळोवेळी** मार्गदर्शन केले त्या मान्यवरांचे आम्ही शतशः ऋणी आहोत.

**मा. अभयसिंह राजे भोसले,** सहकार मंत्री महाराष्ट्र राज्य
**मा. शिवाजीराव देशमुख,** अध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस
**मा. गुलाबराव शेळके,** अध्यक्ष मुंबै बँक
**एस. एस. कदम,** अध्यक्ष मराठा मंदिर बँक संचालक मुंबै बँक
**अशोकराव गजरे,** मुंबै बँक, **सतीश चव्हाण,** संचालक मुंबै बँक
**अशोकराव शेटे,** अध्यक्ष सातारा सहकारी बँक
**बाबुराव रामिष्टे,** सरचिटणीस अखिल भा. माथाडी व जनरल कामगार युनियन
**दिनकर भाऊ पाटील उर्फ पोपटशेट,** अध्यक्ष शिवसागर सहकारी पतपेढी
**वसंतराव देशमुख,** संचालक मुंबई सहकारी बोर्ड, **मोहनराव कदम,** संचालक मुंबई सहकारी बोर्ड
**कटक धोंड साहेब,** जॉइंट रजिस्टॉर, **बंगाळ साहेब** जिल्हा उपनिबंधक, **वाघ साहेब** जिल्हा उपनिबंधक सहकार खाते **बांबर्डेकर साहेब** अंतर्गत हिशेब तपासणीस
**जगन्नाथ जाधव,** अध्यक्ष परळी विभाग सहकारी पतपेढी **शामराव निपाने,** उपाध्यक्ष परळी विभाग सहकारी पतपेढी **सर्जेराव डांगरे** चिटणीस परळी विभाग सहकारी पतपेढी **श्रीरंग आरगडे** खजिनदार परळी विभाग सहकारी पतपेढी **मारुतराव शिंदे,** अध्यक्ष कुशल सहकारी पतपेढी **यादवराव भोसले** संचालक श्रमिक सहकारी बँक उरमोडी धरणग्रस्त कृती समिती, परळी विभाग शेतकरी संघ, मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अधिकारी कर्मचारी **भास्करराव साळुंखे** अजिंक्यतारा सागरी सहकारी पतपेढी, नागदेवी कामगार सभा, समर्थ सहकारी पतपेढी सातारा सहकारी बँक कर्मचारी अधिकारी व इतर मान्यवर बँक पतसंस्था आश्रय अभ्यासिका यांचे आम्ही आभारी आहोत.

## श्रध्दांजली :-

आपल्या पतसंस्थेचे आदरनिय मार्गदर्शक मा. आमदार **कै. प्रेमकुमार शर्मा** आणि नगरसेवक **कै. दिनकर झारापकर** यांना भावपूर्ण श्रध्दांजली तसेच संस्थेचे ज्ञात अज्ञात सभासदांच्या मृत आत्म्यास शांती लाभो हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

# शिवसह्याद्री सहकारी

खेतवाडी,

## ताळेबंद पत्रक

| १९९१-९२ रु. पैसे | मांडवल व देणे | | १९९१-९२ रु. पैसे |
|---|---|---|---|
| | **भाग भांडवल** | | |
| ५,००,०००-०० | अधिकृत भाग भांडवल | | |
| | (प्रत्येक १० रु. चे ५०,०००/भाग) | | ५,००,०००-०० |
| | वसुल भाग मांडवल | | |
| १,१०,५५०-०० | (प्रत्येकी १० रु. चे १७,०२० भाग) | | १,७०,२००-०० |
| | **राखीव व इतर निधी** | | |
| १,६१६-०० | प्रवेश शुल्क | २,०७७-०० | |
| ५,५५०-०० | इमारत निधी | १३,०२०-०० | १५,०९७-०० |
| | **ठेवी** | | |
| ५८,७०४-९७ | बचत ठेव | ६५,१३९-०१ | |
| २८,२४३-६३ | सक्तीची बचत ठेव | ७०,६९०-०८ | |
| १३,६९७-०० | आवर्त ठेव | ३६,७३०-०० | |
| १,५१,३००-०० | मुदत ठेव | ३,९६,४५०-०० | |
| १,७४,५५५-०० | दैनंदिन बचत ठेव | १.४६,२००-०० | ७,१६,१०९-०९ |
| | **इतर देणी** | | |
| २१३-३५ | आवर्त ठेव व्याज | १,९७४-८० | |
| ३,९७२-१० | मुदत ठेव व्याज | १७,४९१-१५ | |
| १,१६२-४५ | दैनंदिन बचत ठेव व्याज | १,४८६-१० | |
| — | हिशेब तपासणी फी देणे | १,०००-०० | २१,९५२-०५ |
| | **नफा-तोटा खाते** | | |
| | चालू वर्षाचा नफा | ७४,९५३-२० | |
| | वजा मागील वर्षाचा तोटा | १०,९४७-५६ | ६४,००५-६४ |
| ५,५७,५६४-५० | एकुण | | ९,८७,३६३-७८ |

**श्री. ज्ञानेश्वर बा. वांगडे**
अध्यक्ष

**श्री. रामचंद्र ब. वाईकर**
उपाध्यक्ष

# पतपेढी मर्यादित

मुंबई-४०० ००४.

३१ मार्च १९९३ अखेर

| ३१ मार्च १९९२ रु. पैसे | जिंदगी व येणे | | ३१ मार्च १९९३ रु. पैसे |
|---|---|---|---|
| | **रोख व बँकेतील शिल्लक** | | |
| १०,९८१-०२ | हातातील रोख शिल्लक | १२,८७०-२७ | |
| ५,५४९-१७ | बँकेतील शिल्लक | ७२,६०४-६१ | ८५,४७४-८८ |
| | **गुंतवणुक** | | |
| १००-०० | मुंबई जि. मध्य. सह. बँक भाग | १००-०० | १००-०० |
| २०,०००-०० | ,, ,, ,, ,, ,, मुदत ठेव | | |
| | **कर्ज** | | |
| ५,०४,१७५-०० | मध्यम मुदत तारण कर्ज | १२,८२,९७५-०० | |
| — | अहवाल वर्षात वसुल | ४,२८,०४५-०० | ८,५३,५२५-०० |
| | ठेव तारण कर्ज | ८,५९५-०० | |
| ५,८११-७५ | **इतर येणी** | | ४०,९९१-४० |
| | कर्जवरील येणे व्याज | | ७,२७२-५० |
| | स्टेशनरी स्टॉक | | |
| १०,९४७-५६ | **नफा तोटा खाते** | | — |
| | तोटा | | |
| ५,५७,५६४-५० | | | ९,८७,३६३-७८ |

माझ्या आज रोजीच्या अहवाला प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| श्री. भरत शि. पिंपळे | श्री. रामचंद्र धों. वांगडे | श्री. प्रकाश पु. बांबर्डेकर |
| चिटणीस | खजिनदार | (लेखा परीक्षक) |

# शिवसह्याद्री सहकारी

खेतवाडी,

## नफा–तोटा पत्रक

| १९९१–९२ रु. पैसे | खर्च | | १९९२–९३ रु. पैसे |
|---|---|---|---|
| | **ठेवीवरील व्याज** | | |
| २१३-३५ | आवर्त ठेव | २,४७८-९० | |
| ३,९७२-१० | मुदत ठेव | २०,९८६-१५ | |
| १,१६२-४५ | दैनंदिन बचत ठेव | ८,३१५-६० | |
| ४६०-६० | बचत ठेव | ३,३८८-४० | |
| ४९३-६३ | सक्तीची बचत ठेव | ५,०९६-४५ | ४०,२६५-५० |
| | **पगार व भत्ते** | | |
| ३,६३३-२० | कर्मचारी पगार | | ६,६००-०० |
| ११,७३२-९० | स्टेशनरी छपाई जाहिरात | | ७,००२-८० |
| | **इतर खर्च** | | |
| ६,०२५-३० | किरकोळ खर्च | ३,४८४-०० | |
| २०९-५० | प्रवास खर्च | ४४८-०० | |
| ५,१५३-४० | दैनंदिन बचत एजंट कमिशन | १२,१७७-९० | |
| — | लॉकर भाडे | ६७०-०० | |
| — | ऑडीट फी | १,६००-०० | |
| — | मुंबई सह. बोर्ड वर्गणी | १०२-०० | १८,४८१-९० |
| | **नफा–तोटा** | | |
| | नफा ताळेबंदाकडे वर्ग | | ७४,५५३-२० |
| ३३,०५६-४३ | | | १,४६,९०३-४० |

**श्री. ज्ञानेश्वर वा वांगडे**
अध्यक्ष

**रामचंद्र ब. वाईकर**
उपाध्यक्ष

# पतपेढी मर्यादित

मुंबई-४०० ००४.

३१ मार्च १९९३ अखेर

| १९९१-९२ रु. पैसे | उत्पन्न | १९९२-९३ रु. पैसे |
|---|---|---|
| | **कर्जावरील व्याज** | |
| १७,०७५-८२ | मध्यम मुदत कर्ज व्याज | १,३८,६४८-४५ |
| | **गुंतवणुकीवरील व्याज** | |
| १,०२६-०० | मुंबई बँक चालू खाते व्याज | ५७८-०० |
| | **इतर उत्पन्न** | |
| १,८५२-०० | कर्ज अर्ज फार्म विक्री | ४,७०४-५० |
| ४७-०५ | दंड व्याज (कर्जावरील) | १,९१०-२५ |
| २,१०८-०० | फिरकोळ जमा | १,०६१-२० |
| | मुंबई बँक लाभांश जमा | १-०० |
| | **नफा तोटा** | |
| १०,९४७-५६ | तोटा ताळेबंदाकडे वर्ग | |
| ३३,०५६-४३ | | १,४६,९०३-४० |

माझ्या आज रोजीच्या अहवाला प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| **श्री. भरत शि. पिंपळे** | **श्री. रामचंद्र धों. वांगडे** | **श्री. प्रकाश पु. बांबर्डेकर** |
| चिटणीस | खजिदार | (लेखा परिक्षक) |

# —: लेखा परिक्षकाचा अहवाल :—

शिवसह्याद्री सहकारी पतपेढी ( मर्यादित ) या पतपेढीचे दिनांक ३१ मार्च १९९३ रोजीचे ताळेबंद पत्रक व त्यांच दिवशी संपणाऱ्या वार्षिक कालावधीचे नफा-तोटा पत्रक मी तपासले असुन त्या संबंधीचा अहवाल खालील प्रमाणे देत आहे.

(१) अहवाल देण्याकरीता आवश्यक असलेली सर्व माहिती व स्पष्टीकरण मला मिळाले.

(२) माझ्या मते महाराष्ट्र सहकार कायदा १९६० व त्या आधीन असलेले नियम तसेच पतपेढी उपविधी यांना अनुसरुन पतपेढीच्या हिशोबी पुस्तके ठेवण्यात आली आहेत. असे माझ्या तपासणीतून आढळले.

(३) सोसायटीचे ताळेबंद पत्रक व नफा-तोटा पत्रक पतपेढीच्या हिशोबाच्या पुस्तकांशी मिळती जुळती आहेत.

(४) मला योग्य वाटणाऱ्या माहितीनुसार व मला मिळालेल्या स्पष्टिकरणानुसार माझ्या मते पतपेढीचे संबंधीत हिशेब महाराष्ट्र सहकार कायदा १९६० व अधिनियम १९६१ नुसार आणि मला करण्यात आलेल्या खुलाशा-वरुन आवश्यक ती सर्व माहिती देतात.

अ) सोबत जोडलेले ताळेबंदपत्रक पतपेढीची दि. ३१ मार्च १९९३ रोजीची खरी व योग्य स्थिती दर्शविते

ब) सोबत जोडलेले नफा-तोटा पत्रक पतपेढीच्या दि. ३१ मार्च १९९३ अखेर वर्षाचा खरा व योग्य नफा दर्शवितात.

प्रकाश पुरुषोत्तम बांबर्डेकर
चार्टर्ड अकाउंटंट

दिनांक १-७-१९९३

# शिवसह्याद्री सहकारी पतपेढी मर्यादित

१०, अतुल निवास, पहिला मजला, खेतवाडी ७ वी गल्ली, मुंबई-४०० ००४.

संस्था आकर्षक व्याज दराने सभासदांच्या खालील ठेवी स्वीकारते

(१) दामदुप्पट ठेव योजना

(२) मुदत ठेव योजना

(३) आवर्त ठेव योजना

(४) दैनंदिन बचत ठेव योजना

(५) बचत ठेव योजना